**संक्षिप्त खटला क्र. ६०/२०२१**
**संजय पाशिलकर वि. प्रतिक किसन पडवळ**
(CNR No.MHRG 090001592021)

**<u>निशाणी क्र.१ वरील आदेश</u>**

१. फिर्यादपत्रक, फिर्यादीची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २०२ ची तपासणी नि.क्र.५ व फिर्यादसोबतची कागदपत्रे विचारात घेतली. फिर्यादीतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

२. फिर्याद, फिर्यादीच्या शपथेवर नोंदवलेल्या पडताळणीवरुन आरोपीने दि. ०३.११.२०२० रोजीचा रक्कम रु.२,००,०००/- चा त्याच्या बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा गोरेगाव (पश्चिम), मुंबई येथील खाते क्र. ६८०१७२७०७७९ वरील धनादेश क्र. १०२७८० फिर्यादीला कायदेशिर जबाबदारी फेडण्यासाठी दिल्याचे दिसते. सदर धनादेश फिर्यादीने एच.डी.एफ.सी.बँक, शाखा रोहा येथील त्याच्या खात्यात वटवण्यासाठी सादर केला असता तो दि.१४.१२.२०२० रोजी न वटता बँकेच्या 'फन्डस् इनसफिशिअंट' या शेऱ्यासह परत आल्याचे दिसते.

३. फिर्यादीने दि.६.१.२०२१ रोजी आरोपीला पाठवलेली नोटीस आरोपीला दि.११.१.२०२१ रोजी त्याला प्राप्त झाली. आरोपीने नोटीस मिळाल्यापासून १५ दिवसात फिर्यादीला धनादेशाची रक्कम दिली नाही. म्हणून आरोपीने प्रथमदर्शनी चलनक्षम दस्तऐवज अधिनियम १८८१ चे कलम १३८ अन्वये दंडनीय अपराध केल्याचे दिसते. म्हणून आरोपीविरूध्द आदेशिका जारी करण्यास पुरेसे कारण आहे अशी माझी खात्री झाली आहे. या कारणास्तव खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

(अ) आरोपीविरुध्द फौ.प्र.सं., १९७३ चे कलम २०४ अन्वये चलनक्षम

दस्तऐवज अधिनियम, १८८१ चे कलम १३८ नुसार दंडनीय अपराधासाठी आदेशिका जारी करण्यात येते.

(ब) आरोपीला समन्स काढावे.

(क) मा. सर्वोच्च न्यायालयाने दामोदर एस. प्रभु वि. सय्यद बाबालाल २०१० ए.आय.आर. (एस.सी.) १९०७ मध्ये दिलेले निर्देश नोंद करावेत.

(ड) आरोपीने प्रकरणात हजर झाल्यानंतर पहिल्या अथवा दुसऱ्या तारखेला अपराध तडजोडीने मिटवण्यास अर्ज केल्यास व त्याप्रमाणे तडजोड मान्य होताना आरोपीवर कोणताही खर्च लादला जाणार नाही.

(इ) आरोपीने प्रकरणात दुसऱ्या तारखेनंतर पुढे कोणत्याही टप्प्यावर अपराध तडजोडीने मान्य केला तर फिर्यादीत नमूद धनादेशाच्या १० टक्के रक्कम मा. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड यांच्याकडे जमा करण्यासाठी या न्यायालयात भरण्याची अट लादण्यात येईल व अपराध तडजोडीने या अटींची पुर्तता केल्यानंतरच मिटेल.

(फ) आरोपीला पुढे असेही सुचित करण्यात येते की, मा. सर्वोच्च न्यायालयाने नमुद प्रकरणात दिलेल्या निर्देशानुसार मा. उच्च न्यायालय अथवा मा. सत्र न्यायालयात अपील अथवा रिव्हीजन दाखल झाल्यानंतर तडजोड करायची असल्यास फिर्यादीत नमुद धनादेशाच्या १५ टक्के रक्कम भरावी लागेल.

(ग) आरोपीने मा. सर्वोच्च न्यायालयात अपिल अथवा रिव्हीजन दाखल झाल्यावर तडजोड करायची असल्यास फिर्यादीत नमुद धनादेशाच्या २० टक्के रक्कम भरावी लागेल.

--स्वाक्षरी--

दि.९.२.२०२२

(स. दि. कमलाकर)
प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, रोहा.